







पेपरडिशची जादू

- कल्पना संचेती







पेपरडिशची जादू

कल्पना संचेती

❒ प्रकाशक :
कजा कजा मरू प्रकाशन
गरवारे बालभवन,
सारसबागेसमोर, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी क्रमांक : २४४४२१०९

❒ प्रकाशन वर्ष : २००६

❒ मुद्रक :
मंजिरी नागपूरकर
स्क्रिप्ट आर्ट,
९१४ सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

❒ किंमत : २५/-

पेपरडिशची जादू

कल्पना संचेती

कजा कजा मरू प्रकाशन
गरवारे बालभवन

पेपरडिशची जादू

पेपरडिश जादूची !
गंमत जंमत करण्याची...

उलट करा, सुलट बघा,
कडेला नक्षी, मधे फुगा

वापरा जशी हवी तशी,
कागदाजी ही तर बशी

कधी दुमडा, कधी कापा,
कधी चिकटवा आणि रंगवा

पेपरडिश जादूची,
गंमत जंमत करण्याची

मोठा गोल, छोटा गोल,
अर्ध गोल, पोकळ गोल

विचार करून वापरा गोल,
छोट्या गोष्टींचं मोठं मोल !

कधी याची बाहुली होते,
कधी अस्वल, कधी मासा

कोण कोण लपलंय यात बघा,
कधी घड्याळ, कधी ससा

पेपरडिश जादूची,
खूपच आपुल्या कामाची

गोष्टीत याचे पपेट होते,
गाणी सांगताना मजा वाढते

घर आपुले सजवू या,
पत्र-पेटी बनवू या

उन्हाळा आला - आईस्क्रिम बनवू,
पिंटू घाबरतो - उंदीर बनवू

मुक्ताचं लाडकं फुलपाखरू करू,
पिसारेवाला मोरही करू

ससा बघून सगळे हसा,
साप बघून सगळे फसा

कधी चिमणी, कधी झाड,
पाऊस आला तर छत्री तयार

पेपरडिश जादूची,
जंतर मंतर करण्याची

खायला चॉकलेट, चेंडू खेळायला,
कलिंगडाची फोड, तहान भागवायला

पिटुकला उंदीर, बाहुली डोलती,
कधी मावळा तर कधी गणपती

सगळीकडे दिसणारी,
स्वस्त न् मस्त असणारी

पेपरडिश जादूची,
दोस्त आपुली सर्वांची.

- *कल्पना संचेती*

पुस्तकापूर्वी...

एखादी गोष्ट घडण्यासाठी काहीतरी निमित्त लागतं. पेपरडिशच्या विविध वस्तूंच्या निर्मितीमागेही असाच एक छोटासा प्रसंग घडला. अदितीच्या शाळेत त्या दिवशी छोटासा खाऊचा कार्यक्रम होता. तेव्हा ती बालवाडीत होती. सतरा-अठरा वर्षापूर्वीची ही घटना. मी शाळेतून तिला आणायला गेले होते. सगळी मुलं खाऊचा आस्वाद घेत होती. माझं लक्ष मात्र तिथे ठेवलेल्या मोठ्या टेबलाकडे गेलं. कोरडा खाऊ खाऊन टाकलेल्या पेपरडिशेस आणि आईस्क्रिमच्या प्लॅस्टिकच्या कपांचा टबमधे ढीग साठला होता. मला त्या क्षणी त्यातल्या काही डिशेस आणि कप उचलून घरी आणावेसे वाटले. मनात आलं, ह्यापासून नक्की काहीतरी बनवता येईल आणि खरंच, त्यातल्या काही डिशेस, कप, चमचे घरी आणले. कप गरम पाण्याने धुतले, डिशेस वेगळ्या केल्या आणि त्या घेऊन बसले. त्यांना अर्धे दुमडून, कुठे कापून, तर कधी दोन-तीन डिशेस एकत्र चिकटवून काही करता येतं का हे बघायला लागले. म्हणजे खरं तर त्या पेपरडिशेसबरोबर बराच वेळ खेळत राहिले. हळूहळू पेपरडिशेसची वैशिष्ट्यं मला उलगडायला लागली. त्याची फुगीर पाठ, त्यावरील घड्याघड्यांचं नक्षीकाम, मधला छोटा गोल, त्यातील खोलगट भाग मला खुणावू लागले. अर्धगोल, त्रिकोण, छोटा गोल, मोठा गोल, पोकळ गोल असे कितीतरी आकार मला त्यात दिसायला लागले. पेपरडिशचे कितीतरी तुकडे माझ्यासमोर पडले होते. मी एकमेकांना ते जोडून बघितले, तर काय आश्चर्य ! एक गोंडस 'अळी' त्यात मला दिसायला लागली. मी ती चिकटवली, रंगवली, सर्वांना दाखवली. सगळ्यांना खूप आवडली. हीच ती पहिली सुरवात...

त्यानंतर मग त्यात अनेक गोष्टींची भर पडत गेली. गरवारे बालभवनमध्ये काम करत असल्याने मुलांबरोबर ह्या सगळ्याच गोष्टी करून बघता आल्या. त्यामुळे अनेक वस्तूंची निर्मिती सहजच होत गेली. बालभवनच्या संचालिका शोभाताईंचं अशा गोष्टींना नेहमीच प्रोत्साहन असतं, त्यामुळे मी अधिक उत्साहानं काम करत राहिले.


ह्या पुस्तकात पेपरडिशच्या वस्तूंचे जास्तीत जास्त प्रकार देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही त्यात प्रत्येकाच्या कल्पकतेनं अधिक भर पडत राहणार हे नक्की !


ह्यातून तयार झालेल्या वस्तूंचा, गोष्टी सांगताना, गाणी सांगताना पपेट म्हणूनही छान वापर करता येतो. पेपरडिश हा प्रकार स्वस्त आणि सहज उपलब्ध आहे. ह्यातून तयार होणारे प्राणी, पक्षी कोणालाही सहज करता येतात. त्यामुळे यांचा वापर करणं खूप सोयीचं आहे. त्यांना तेली खडूनं, पेस्टल रंगानं, पोस्टर रंगानं, कधी कागद चिकटवून आकर्षक बनवता येतं. त्याची मजबूती वाढवता येते. प्रशिक्षणात हे शिकवता येतं. या सगळ्याचं स्फूर्तिस्थान आमची बालभवनची मुलं आहेत. त्यांची मी ऋणी आहे. धन्यवाद !

- कल्पना संचेती

कलिंगडाची फोड








पेपरडिश मधोमध दुमडायची



कलींगडाच्या फोडीसारखी रंगवा

ती जमिनीवर उभी राहिल

उंदीर






शेपटी, कान, पाय...


काळ्या, राखाडी रंगातला उंदीर छान दिसतो

अळी

पेपरडिश दुमडून मधला छोटा गोल कापायचा




कापलेले भाग चकटवायचे




चिकटवून तयार झालेल्या अळीला छान रंगवा

छत्री




कापलेले भाग
चिकटवायचे




त्यावर आवडते रंग द्यायचे आणि
नक्षीकाम करायचे

मश्रुम्स



मश्रुम्सचे आकार कापून ती रंगवली की गोड दिसतात

मासा




तयार झालेल्या माशाला रंगवायचे आणि मागून पट्टी लावायची. ज्याच्यामुळे ते हातात घातला येईल एखाद्या पपेसारखा.


डोलणारी बाहुली




चेंडू



कासव




घड्याळ






घड्याळासाठी २ काटे
कापायचे आणि लांबवायचे


चिमणी






परडी







मावळा शिपाई







आईस्क्रिम कोन






सफरचंद







देठ आणि पान
चिकटवणे सुंदर केशरी,
लाल रंगाने रंगवायचे.

चॉकलेट







झाड




खोडाचा
भाग
चिकटवणे



फूल






पाकळ्या
कापून
चिकटवणे


गोगलगाई



शेपूट आणि
अँटीना / मिशा




चेहरा





सूर्य






पत्रपेटी









अर्ध्या पेपरडिशचा
कप्पा तयार होईल.

पोपट




कूक / स्वयंपाकी



राक्षस मुखवटा





माकड



दोन पेपरडिश चित्रांत दाखवल्याप्रमाणे चिकटवणे


फुलपाखरू






हा भाग वेगळ्या कागदाचा कापावा

सर्व फुलपाखरांना वेगवेगळ्या पद्धतीने रंगवून बघा




पेपरडिश दुमडून मधला छोटा गोल कापायचा


टेडी / बाळ अस्वल






मुनिया






मुलगी








डिश दुमडून मधला
गोल कापणे

घुबड

उरलेल्या
डिशमधून
कान, पाय, चोच
असे आकार
कापायचे.
झाडाचं खोड
आणि पानंही
काढता येतील.





ढालकिडा



Lady bird beetle


जपानी बाहुली






साप








हुप्पो




जेलीफिश











पान, देठ कापून
चिकटवणे

मोसंबी


सिताफळ






पान, देठ कापून
चिकटवणे

पांडा








ससा

अष्टविनायक गणपती



मांजर



मुलगी




मोर









हत्ती - मुखवटा







दागिने

कोंबडा




विदूषक



मांजर



मोत्या



हत्ती

